**ऑक्टोबर महिन्यात करावयाची शेतीची कामे खालीलप्रमाणे - (पुणे जिल्हा)**

कृषिविद्या

ऊस –

१) लागवडीनंतर ६ ते ८ आठवड्यांनी आडसाली पिकास खताचा दुसरा हप्ता द्या (१६० किलो नत्र प्रती हेक्टर)

२) उभ्या पिकास शिफारशीप्रमाणे वेळेवर पाण्याच्या पाळ्या द्या.

३) पूर्वहंगामी ऊस लागवडीसाठी शिफारशीप्रमाणे पूर्व मशागत करून शेत लागवडी योग्य तयार करा.

४) पूर्वहंगामी ऊस लागवडीसाठी ऊत्तम प्रतीचे नर्सरीतील बियाणे, रासायनिक खते इ.ची व्यवस्था करून ठेवा. तसेंच शिफारस केलेल्या जातींपैकी एका जातीची निवड करा. (को.७४०. को.८६०३२, को.८०१४, को.एम.८८१२१ व को.९४०१२)

५) ठिबक सिंचन पध्दतीचा ऊसासाठी वापर करा.

६) पूर्वहंगामी ऊसाची लागवड १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीत पूर्ण करा.

७) पाण्याची उपलब्धता पाहूनच ऊस क्षेत्राची लागवड करा.

८) पाण्याची बचत करण्यासाठी आच्छादनाचा वापर करा. तसेंच आवश्यकतेनुसार एकाडएक सरीस पाणी देणे पध्दतीचा वापर करा.

९) दोन डोळ्यांची टिपरी वापरून लागण करा. लागण करतेवेळी दोन टिप-यातील अंतर १२ ते १५ सें.मी. ठेवा. भारी जमिनीत हेक्टरी २५,००० टिपरी पुरेशी होतात. तसेच मध्यम ते हलक्या जमिनीत ३०,००० टिपरी लावावीत. एक डोळा पध्दतीमध्ये दोन टिप-यातील अंतर ३० सें.मी. ठेवावे. बेणे हेक्टरी ३३,५०० डोळे वापरावेत.

१०) मध्यम प्रतीच्या जमिनीत पाणी देऊन ओली लागण करावी.त भारी, चोपण व खारट जमिनीत कोरडी लागण करावी. लावताना डोळे बाजूला येतील अशी काळजी घ्यावी.

११) पूर्वहंगामी ऊसास लागणीचेवेळी ३४ किलो नत्र, ८५ किलो स्फुरद व ८५ किलो पालाश प्रती हेक्टरी द्यावे.

१२) ऊसावरील लोकरी माव्याचे नियंत्रणासाठी एन्डोसल्फान ५०० मि.ली.+ मेटॅसिस्टॉक १००० मि.ली + ५०० मि.ली. स्टीकर ५०० लिटर पाण्यातून प्रतीहेक्टरी फवारणी करावी. त्यानंतर १५ दिवसांनी २५०० क्रायसोपर्ला अथवा कॅनोबात्रा या परोपजीवी किडीच्या अळ्या प्रती हेक्टरी ऊस पिकावर सोडाव्यात.

गहू –

१) गहू पिकासाठी चांगल्या निच-याची भारी आणि खोल जमिनीची निवड करा.

२) हलक्या व मध्यम जमिनीत भरपूर भरखते घालणे आवश्यक आहे.

३) जिरायत गहू ओलावा टिकवून धरणा-या भारी जमिनीतच घ्यावा.

४) पेरणीची वेळ – जिरायत गव्हाची पेरणी ऑक्टोबरच्या दुस-या पंधरवड्यात करावी. बागायती गव्हाची पेरणी नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात पूर्ण करावी. त्यासाठी जमिनीची पूर्वमशागत करून जमीन तयार ठेवावी.

५) पेरणी दोन ओळीतील अंतर २२.५ ते २३.० सें.मी. ठेवून करावी. बी ५ ते ६ से.मी. पेक्षा जास्त खोल पेरू नका.

६) उभी आडवी पेरणी करू नये. एकेरी पेरणीमुळे आंतरमशागत करणे सुलभ होते. पेरणी शक्यतो दोन चाडी पाभरीने करावी. म्हणजे पेरणीबरोबरचा रासायनिक खताचा पहिला हप्ता देता येईल.

७) जमिनीच्या उतारानुसार २.५ ते ३.० मीटर रूंदीचे सारे पाडावेत व आडव्या दिशेने पाट पाडावेत.

८) बियाणे – गव्हाच्या चांगल्या उत्पादनासाठी हेक्टरी २० ते २२ लक्ष झाडांची संख्या असणे आवश्यक आहे. यासाठी नोव्हेंबरमध्ये पेरताना हेक्टरी १२५ ते १५० किलो बियाणे वापरावे.

- उशीरा पेरणीसाठी हेक्टरी १२५ ते १५० किलो बियाणे वापरावे आणि पेरणी १८ सें.मी. अंतरावर करावी.
- जिरायत गव्हासाठी हेक्टरी ७५ ते १०० किलो बियाणे वापरावे व २२.५ सें.मी. अंतरावर पेरणी करावी.

९) सुधारीत वाण –

जिरायत –

अ) बन्सी-एन-५९,

ब) सरबती-एन-८२२३,एन,५७४९ आणि एन.आय.५४४९, एन.आय.डी.डब्ल्यू.१५(पंचवटी)

बागायत गहू –

वेळेवर पेरणी –एच.डी.२१८९, एच.डी.-२२७८, एच.डी.-२३८०, डी.डब्ल्यू.आर.१६२,
एम.ए.सी.एस.२४९६, एम.ए.सी.एस-२८४६, एन.आय.ए.डब्ल्यू.३०१(त्र्यंबक),
एन.आय.डी.डब्ल्यू-२९५(गोदावरी)

उशीरा पेरणी – एच.डी-२५०१, एच.आय-२७७ आणि एन.आय.ए.डब्ल्यू.-३४

१०) खते –

अ) हेक्टरी २५ ते ३० गाड्या शेणखत कुळवाच्या पाळीने मिसळावे.

ब) बागायती गव्हास वेळेवर पेरणीसाठी हेक्टरी १२० किलो नत्र, ६० किलो स्फुरद व ४०

किलो पालाश द्यावे. निम्मे नत्र व संपुर्ण स्फुरद व पालाश पेरणीचेवेळी पेरून द्यावे. उरलेले निम्मे नत्र पेरणीनंतर तीन आठवड्यांनी खुरपणी झाल्यावर द्यावे.

क) उशीरा पेरणीसाठी हेक्टरी ८० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश ही खते वरीलप्रमाणेच दोन हप्त्यात द्यावे.

ड) जिरायत गव्हास पेरणीच्या वेळी हेक्टरी ४० किलो नत्र आणि २० किलो स्फुरद आणि २० किलो पालाश द्यावे.

इ) पेरणीपूर्वी बियाण्यावर अँझोटोबॅक्टर आणि सफुरद विरघळविणा-या जीवाणुंची २५० ग्रॅम प्रती १० किलो याप्रमाणे बियाण्यावर बिजप्रक्रीया करावी.

ज्वारी –

१) रब्बी ज्वारी पेरणीसाठी सुधारीत व शिफारस केलेल्या वाणांची निवड करा. हलक्या जमिनीसाठी सिलेक्शन-३ तसेंच मध्यम ते भारी जमिनीसाठी एस.पी.व्ही.८६, स्वाती, सी.एस.एच.१३(आर), फुले यशोदा, मालदांडी ३५-१, माऊली या वाणांचा वापर करा.

२) पेरणी १५ ऑक्टोबरपर्यत संपवावी.

३) प्रतीहेक्टरी १० किलो बियाणे वापरून पेरणीपुर्वी ३०० मेश गंधक ४ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात बिजप्रक्रीया करा. तसेच १० किलो बियाण्यास २५० ग्रॅम अँझोटोबॅक्टरच्या जिवाणूसंवर्धनाची प्रक्रीया करा.

४) पेरणीसाठी ४५ X १५ सें.मी. अंतर ठेवा.

५) बागायती पिकासाठी भारी जमिनीत १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश प्रतिहेक्टरी द्यावे. ५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश पेरणीचेवेळी पेरून द्यावे व उरलेले ५० किलो नत्र पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी द्यावे. मध्यम जमिनीत हेक्टरी ८०.४०.४० आणि हलक्या जमिनीत ५०.२५.० असा नत्र, स्फुरद व पालाश खताची मात्रा वरीलप्रमाणे दोन हप्त्यांत द्यावी.

६) कोरडवाहू पिकासाठी हेक्टरी २५ ते ३० किलो नत्र पेरणीचेवेळी पेरून द्यावा.

७) कोरडवाहू पिकासाठी दोन चाडी पाभरीचा वापर करावा.

८) ज्वारीवरील खोडकीडा, खोडमाशी, मावा, तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव दिसताच एन्डोसल्फान ३५ टक्के १४ मिली. किंवा डोयमेथोएट ३० टक्के १० मिली. १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. किडग्रस्त रोपे काढून जाळून टाकावीत. खोडकीड व खोडमाशीच्या जैविक नियंत्रणासाठी दोन ट्रायकोकार्ड प्रती एकरी पिकामध्ये लावावेत.

९) लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी मिथील पॅराथिऑन २ टक्के भुकटी २० किलोग्रॅम प्रतीहेक्टरी धुरळणी करावी.

भईमूग -

१) पीक तणविरहीत ठेवा.

२) पाण्याचा ताण पडल्यास सरंक्षीत पाणी द्या.

३) भुईमुगावरील टिक्का आणि तांबेरा रोग नियंत्रणासाठी कार्बेन्डँझिम (०.०५ टक्के किंवा मँकोझेब ०.२५ टक्के) पेरणीनंतर ३० दिवसांनी २० दिवसांच्या अंतराने ३ ते ४ फवारण्या कराव्यात.

४) पाने गुंडाळणारी अळी, केसाळ अळी, घाटे अळी या किडीच्या नियंत्रणासाठी मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के १४ मि.ली. किंवा सायपरमेथ्रीन २० इ.सी. ४ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. किंवा क्विनॉलफॉस १.५ टक्के भुकटी किंवा मॅलेथिऑन ५ टक्के भुकटी किंवा फोझेलॉन ४ टक्के भुकटी २० किलो प्रतिहेक्टरी धुरळावी. अथवा ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.

हरबरा –

१) मध्यम ते भारी व पाण्याचा निचरा होणारी जमीन निवडा.

२) पेरणी – जिरायत हरबरा पेरणी ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात करावी. बागायत हरब-याची पेरणी २० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर या दरम्यान पूर्ण करावी. यामुळे जास्त उत्पादन मिळण्यास पोषक अशा हवामानाचा पिकास उपयोग होतो. पेरणी वाफश्यावर करावी.

३) बियाणे – वाणानुसार बियाण्याचे प्रमाण वापरावे. विकास आणि फुले जी-१२ या वाणासाठी हेक्टरी ७० किलो, विश्वास आमि विजयसाठी ८५ किलो तसेंच विशाल व विराट या वाणासाठी हेक्टरी १०० किलो बियाणे वापरावे.

४) बीजप्रक्रीया – पेरणीसाठी प्रमाणीत अगर खात्रीचे बियाणे वापरावे. बुरशीनाशकाची बीजप्रक्रीया केलेली नसल्यास प्रतिकिलो बियाण्यास १ ते १.५ ग्रँम बाविस्टीन किंवा २ ते २.५ ग्रँम थायरम अथवा कँप्टन हे बुरशीनाशक चोळावे. पेरणीपुर्वी बियाण्यास गुळाच्या थंड पाण्यातून चोळावे व बियाणे सावलीत सुकवून लगेच पेरावे.

५) पेरणी ३० बाय १० सें.मी. अंतरावर करून झाडांची संख्या हेक्टरी ३,३३,३३३ ठेवावी.

६) खते –

जिरायत हरभरा – १२.५ किलो नत्र आणि २५ किलो स्फुरद (२८ किलो युरीया आणि १५६ किलो सुपर फॉस्फेट) प्रती हेक्टरी पेरणीपुर्वी जमिनीत पेरून द्यावी. शक्यतो दोन चाडी पाभरीने पेरणी करावी.

बागायत हरभरा – २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरद (५६ किलो युरिया आणि ३१२ किलो सुपर फॉस्फेट) प्रति हेक्टरी पेरणीपुर्वी जमिनीत पेरून द्यावी. शक्यतो दोन चाडी

पाभरीने पेरणी करावी.

७) पाणी व्यवस्थापन – हरभरा पिकास साधारणपणे १२ सें.मी. पाण्याची गरज असते. पेरणी वाफश्यावर करावी. जमिनीतील ओल पाहून पहिले पाणी ३० ते ३५ दिवसांनी फांद्या फुटताना द्यावे आणि दुसरे पाणी ६० ते ६५ दिवसांनी घाटे भरताना द्यावे. प्रत्येकवेळी पाणी योग्य प्रमाणात द्यावे. जास्त पाणी दिले गेल्यास पीक उभळण्याचा धोका असतो.

८) आंतरमशागत – पेरणीनंतर २१ दिवसांनी कोळपणी आणि एक खुरपणी करावी. आवश्यकता भासल्यास दुसरी खुरपणी पीक फुलो-यात येण्यापुर्वी करावी. खुरपणीचा खर्च कमी करण्यासाठी पेरणीपुर्वी फ्ल्युक्लोरॅलीन बासालिन अथवा पेंडीमीथॅलीन स्टॉम्प हे तणनाशक हेक्टरी १.५ लिटर, ५०० लिटर पाण्यातून फवारावे आणि कुळवाची एक पाळी द्यावी म्हणजे तणनाशक मातीत चांगले मिसळण्यास मदत होते.

करडई –

१) पेरणीसाठी सुधारीत वाणांचा वापर करा. भिमा १३० ते १३५ दिवसात तयार होते आणि उत्पन्न १४ ते १६ क्विंटल प्रतिहेक्टर येते. पेरणीसाठी भीमा अथवा जे.एल.एस.एफ.-४१४ या सुधारीत जातीची निवड करा.

२) पेरणीसाठी हेक्टरी १० ते १२ किल बियाणे वापरा.

३) पेरणीपुर्वी बुरशीनाशक बाविस्टीन (२ ग्रॅम प्रति किलो) व त्यानंतर अँझोटोबॅक्टर जीवाणू २५० ग्रॅम प्रती १० किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रीया करा.

४) करडईचे सलग पीक घ्या.

५) संरक्षीत ओलीताचा वापर करा.

६) पेरणी अवर्षणप्रवण क्षेत्रात सप्टेंबरच्या दुस-या आठवड्यात व इतर ठिकाणी सप्टेंबरचा दुसरा आठवडा ते आक्टोबरचा १ ला आठवडाअखेर संपवावी. पेरणी उशीरात उशीरा १० ऑक्टोबरपुर्वी पूर्ण करावी.

७) पेरणी ४५ सें.मी. अंतराच्या पाभरीने करावी. बियाणे ५ ते ६ सें.मी. खोलीवर पडेल अशी काळजी घ्यावी.

८) शक्य असल्यास ५ ते १० टन शेणखत शेवटच्या कुळवणीच्यावेळी जमिनीत मिसळावे. याशिवाय कोरडवाहू पिकासाठी हेक्टरी एक लाख झाडे ठेवावीत.

खरीप पिके –

घेवडा, बाजरी, सोयाबीन, धणे, वाटाणा इ. खरीप पिकांची पक्वतेनुसार वेळेवर काढणी करावी. धान्य उन्हामध्ये चांगले वाळवून नंतरच ते साठवून ठेवावे.

तूर –

मावा, तुडतुडे, फुलकिडे, पिसारी पतंग, घाटे अळी यांच्या नियंत्रणासाठी एन्डोनल्फान ३५ टक्के २० मि.ली. किंवा क्विनॉलफॉस १५ मि.ली. १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करा. तसेंच फेरोमेन सापळ्यांचा वापर करा. घाटेअळीच्या नियंत्रणासाठी बी.टी./HaNPV चा वापर करा. फवारणी शक्य नसेल तर कार्बारील १० टक्के भुकटी किंवा क्विनॉलफॉस १.५ टक्के भुकटी किंवा मिथिल पॅराथिऑन २ टक्के भुकटी २० किलो प्रतिहेक्टरी धुरळावी.

उद्यानविद्या

भाजीपाला –

कांदा –

१) रब्बी कांदा लागवड सपाट वाफ्यात १२.५ X ७.५ सें.मी. खोलीपर्यंत करावी. लागवडीपुर्वी हेक्टरी नत्र ५० किलो, स्फुरद ५० किलो, पालाश ५० किलो खते द्यावीत.

२) लागवडीस रोपे उपटणेपुर्वी २४ तास अगोदर त्यांना भरपूर पाणी द्यावे. फार जाड तसेंच फार पातळ रोपे निवडून बाजूला काढावीत. आणि सर्वसाधारणपणे ०.५ सें.मी. बुंध्याचा व्यास असलेली रोपे लागवडीस लावावीत. रोपे फार उंच असल्यास त्यांच्या शेंड्याकडचा १ /३ भाग कापावा. रोपांची मुळे १ टक्का युरियात व शेंडे (मोनोक्रोटोफॉस १२.५ मि.ली + डायथेन एम.४५ हे २५ ग्रॅम १० लिटर पाण्यात) औषधात बुडवून नंतर १० लिटर पाण्यात ४ पाकिटे अँझोटोबॅक्टरच्या द्रावणात मुळे बुडवून एकरी लागवड करावी.

३) रब्बी कांद्यासाठी अँग्रीफाऊंड लाईट रेड, एन-२-४-१, पुसा रेड, अर्का निकेतन या जाती लावाव्यात. युरोपियन देशात निर्यातीसाठी लागवड करावयाची असल्यास फुले सुवर्णा आणि कांदा पावडर करीता लागवड करावयाची असल्यास अँग्रीफाऊंड व्हाईट -१, फुले सफेद, एन-२५७-९-१ या जाती वापराव्यात.

४) बियाण्यासाठी २५ ऑक्टोबरनंतर सपाट वाफे किंवा स-या वरंब्यावर ६० X १५ सें.मी., ४५ X ३० सें.मी. अंतरावर लागवड करावी. लागवडीपुर्वी साठविलेल्या कांद्यांना एक लिटर पाण्यात एक ग्रॅम कार्बेन्डॅझिम घालून तयार केलेल्या द्रावणात बुडवावे. बियाणे प्लॉटमध्ये १ ते ५ किलोमिटर अंतर ठेवावे.

५) खरीप जातीचे कांदे काढून १० ते १५ दिवस सुकवून निवड करून त्यांची बियासाठी लागवड करावी.

६) खरीप कांदा तयार होत आला असल्यास त्यांच्या माना तपासाव्यात. माना पार जाड असल्यास पातीत जोर गेला असल्यास त्यावर मोकळा पाण्याचा ड्रम फीरवावा म्हणजे कांदा काढणीस तयार होईल.

७) रब्बी कांदा लावून महिना झाला असल्यास नत्राचा दुसरा हप्ता एकरी ५० किलो द्यावा.
८) पाण्याची उपलब्धता कमी असल्यास किंवा उन्हाळ्यात पाणीपुरवठा कमी पडण्याची शक्यता असल्यास ऊसाऐवजी रब्बी कांदा कॅश क्रॉप म्हणून लागवड करावी.
९) तणनियंत्रण – बासालीन लागणीपूर्वी हेक्टरी १ ते १.५ लिटर (क्रियाशील घटक) किंवा गोल लागणीनंतर २५ दिवसांनी १०० ते २०० मि.ली.(क्रियाशील घटक) फवारावे.

लसूण –
१) लसणाची लागवड ऑक्टोबरच्या दुस-या किंवा तिस-या आठवड्यात सपाट वाफ्यात १० X ७.५ X ३ सें.मी. अंतरावर करावी.
२) श्वेता, गोदावरी, जामनगर या जाती वापराव्यात. लागवडीपुर्वी शेतात हेक्टरी नत्र ५० किलो, स्फुरद ५० किलो व पालाश ५० किलो द्यावे. पूर्वमशागतीचे वेळी हेक्टरी २५ टन शेणखत घालावे.
३) लागवडीपूर्वी लसणाच्या पाकळ्या २० पी.पी.एम. आय.बी.ए. च्या द्रावणात एक तास भिजत ठेवून लावाव्यात

टोमॅटो –
१) धनश्री, भाग्यश्री व राजश्री या जातींच्या बियाण्यास किलोस २ ग्रॅम या प्रमाणात थायरम चोळून / प्रक्रीया करून गादी वाफ्यावर बी रब्बी हंगाम लागवडीसाठी रोपे तयार करण्यासाठी पेरावे.

कोबी – फुलकोबी –
१) पेरणीपूर्वी बी गरम पाण्यात (५० अंश सें.ग्रे.) अर्धा तास किंवा स्ट्रोप्टोसायक्लीनमध्ये (१०० पी.पी.एम) दोन तास बुडवावे नंतर ते सावलीत सुकवावे व गादी वाफ्यावर ओळीत पेरावे.
२) कोबीच्या प्राईड ऑफ इंडीया, अर्ली ड्रम हेड किंवा गोल्डन एकर जातींची निवड करावी तर फ्लॉवरमध्ये स्नोबॉल-१६, पुसा सिंथेटिक, दाणिया, पुसा दिपाली, पुसा स्नो बॉल-१ या जाती पेराव्यात.

बटाटा –
१) ४५ X ३० सें.मी. ते ६० X १५ सें.मी. अंतरावर स-यात किंवा नांगरीने तास टाकून तासात लागवड करावी.
२) कुफरी सिंदूरी, कुफरी लवकर, कुफरी चंद्रमुखी किंवा कुफरी ज्योती या जाती वापराव्यात.

३) २-३ डोळे प्रत्येक फोडीवर राहतील अशा प्रकारे बेणे बटाट्याच्या फोडी कराव्यात.
४) पेरणीपुर्वी बेणे थायरम ३ ग्रॅम प्रती १ किलो क्लोरीनेटेड पाण्यात धूवून घ्यावे.
५) पेरणीसाठी बटाट्याच्या फोडी करतेवेळी कोयता ०.३ टक्के ब्लायटॉक्स या औषधाच्या द्रावणात बुडवावा.
६) लागवडीपुर्वी हेक्टरी ४० ते ५० बैलगाड्या भरखते, लागवडीवेळी वरखते हेक्टरी नत्र १०० किलो, स्फुरद ६० किलो व पालाश १२० किलो द्यावे.

पालेभाज्या –
पालक, मेथी, कोथिंबीर, चाकवत, राजगीरा, शेपू, लेट्यूस इ. पालेभाज्यांची पेरणी अथवा लागवड करावी.

फळबाग –

अंजीर –
१) अंजीर बागेस फळधारणेनंतर प्रत्येक झाडास आळे करून १ महिन्याने ४०० ग्रॅम नत्राचा राहिलेला हप्ता द्यावा.
२) नवीन लागवड केलेल्या फळझाडाच्या कलमा / रोपांभोवती आळी खुरपुन घेऊन आच्छादनाचा थर द्यावा.
३) अंजीरातील तांबेरा रोग नियंत्रणासाठी क्लोरोथॅलोनिल १००० ग्रॅम प्रति ५०० लिटर पाण्यात मिसळून दर १५ दिवसांचे अतराने फवारावे.

द्राक्षे –
१) निम्या आणि त्यापेक्षा अधिक भाग अपक्व असलेल्या सर्व काड्या १ डोळा ठेवून छाटून टाका.
२) बागेत तणे असतील तर त्यांचा बंदोबस्त करा.
३) हिरवळीचे पीक घेतले असेल तर ते गाडून टाका.
४) रोग / किड यांची लक्षणे पाहून एक फवारणी करा.
५) छाटणीपूर्वी एक आठवडा अगोदर पानगळ करण्यासाठी थॉमसन सिललेस, तास-ए-गणेश, सोनाका या जातीसाठी ३ ते ४ टक्के तीव्रतेच्या थोयोयुरीयाची फवारणी करावी तर किशमिश चोर्नी, फलेम सीडलेस या रंगीत जातीवर इथेल १००० पी.पी.एम. या तीव्रतेच्या द्रावणाची फवारणी करावी.
६) छाटणीपूर्वीच एक आठवडा अगोदर एकरी १० टन शेणखत द्यावे. माती परीक्षणाचे आधारे सूक्ष्म अन्नद्रव्ये छाटणीपूर्वीच एकरी १५ किलो फेरस सल्फेट, १० किलो झिंक

सल्फेट आणि २० किलो मॅग्नेशियम सल्फेट द्यावे. रासायनिक खतांच्या एकून मात्रा हेक्टरी नत्र ९०० किलो, स्फुरद ५०० किलो आणि पालाश ७०० किलो देण्याची शिफारस आहे. ह्यापैकी छाटणीपूर्वी २५० किलो आणि छाटणीनंतर १५ दिवसांनी १३५ किलो नत्र द्यावे. व्हर्मीकंपोस्ट बोयोफॉस २५० ते ४०० किलो, बायोमिल (सेंद्रीय जिवाणू खत) ५०० ते ७५० किलो, पी.एस.बी. जिवाणूखते १० ते १५ किलो द्यावीत.

७) प्रत्यक्ष छाटणी १५ ऑक्टोबरच्या दरम्यान करावी.

८) वेलीवरील काड्यात सूक्ष्म घड कितव्या डोळ्यावर आहे याची तपासणी करून घ्यावी.

९) प्रत्येक छाटणी करण्यापूर्वी वेलीवर पाने राहिली असल्यास ती त्वरीत हाताने काढावीत नंतर सूक्ष्मघड तपासणीच्या अहवालानुसार ७,८ किंवा ९ डोळे राखून छाटणी करावी. द्राक्षबागेमध्ये सबकेनचा अवलंब केलेला असल्यास सबकेनच्या पहिल्या किंवा दुस-या डोळ्यावर छाटणी करावी.

१०) छाटणी वापशावर करावी. छाटणी झालेल्या दिवशीच कांड्यांच्या ठरावीक भागावर हायड्रोजन सायानामाईड (किडॉर, डोरबॅंक, डोरमॅक्स) किमान २० मिली. आणि कमाल ४० मि.ली. प्रती लिटर लावा / फवारा. खोड, ओलंड्याची मोकळी झालेली साल काढून त्यांना बोर्डोपेस्ट लावा. उडद्यासाठी किटकनाशकाची एक धुरळणी करा.

११) छाटणीनंतर तणांची मशागतीची राहिलेली कामे पूर्ण करा.

१२) रोगग्रस्त भाग, काड्या, पाने गोळा करून नष्ट करा.

१३) जमीन कडक झाली असल्यास ती हलवून घ्या आणि हलकेसे पाणी द्यावे.

बोर –

१) फळ पोखरणा-या अळीच्या बंदोबस्तासाठी ५० टक्के कार्बारील ४० ग्रॅम किंवा २० टक्के फेनवेलरेट ५ मि.ली. किंवा २५ इ.सी. क्विनॉलफॉस २० मि.ली. १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास वरील औषधात डिनोकॅप १० मि.ली. किंवा ट्रायडेमार्फ १० मि.ली. मिसळून फवारण्या कराव्यात. ६ ते १० दिवसांच्या अंतराने २-३ दिवसांच्या अंतराने २-३ फवारण्या केल्यास किड तसेंच रोग यांचे नियत्रण होईल.

पेरू –

१) मृग बहाराच्या फळाची काढणी चालू ठेवावी.

२) ज्या बागेतील पूर्वीच्या हंगामातील फळे संपली आहेत त्या बागा स्वच्छ करून झाडांना व्यवस्थीत आकार द्यावा.

३) पेरूवरील फलमाशीचा बंदोबस्त करावा. त्यासाठी २५ टक्के सायपरमेथ्रीन ४ मि.ली. १०

लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

४) पेरूवरील फलकुजवा व देवी रोगाच्या नियंत्रणासाठी प्रोपिकनाझोल (०.०१ टक्का) अथवा कार्बेन्डेझिम ५०० ग्रॅम व मॅन्कोझेब १००० ग्रॅम हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून १५ दिवसांच्या अंतराने ३ ते ४ फवारण्या कराव्यात.

लिंबू –

१) जेथे पाऊसमान कमी आहे व जमीन हलकी आहे तेथे हस्तबहार घ्यावा. या बहाराची फळे ऐन उन्हाळ्यात मार्च एप्रिलमध्ये तयार होतात. त्यामुळे त्यांना भाव चांगला मिळतो. हस्तबहाराची फळधारणा वाढविणेसाठी ऑगस्ट – सप्टेंबर महिन्यात १००० पी.पी.एम. सोयकोसीलची फवारणी करावी लागते व त्यानंतर ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात १० पी.पी.एम. २-४-५-टी ची ही फवारणी करावी लागते. ताणामुळे जर झाडांची पानगळ होत नसेल तर बहारासाठी पाणी देणेपुर्वी पानगळ करणेसाठी १ लिटर पाण्यात १ मि.ली. या प्रमाणात इथेलची पानावर फवारणी करावी. बागेची आंतरमशागत करावी. खोडाजवळील भाग कुदळीने चाळून घ्यावा. बांगडी पध्दतीने आळी तयार करावीत. झाडावरील रोगट, वाळलेल्या फांद्या छाटून टाकाव्यात. खोडाला बोर्डोपेस्ट लावावी. बहाराचे पहिले पाणी देणेपुर्वी झाडाचे पसा-याखाली चर करून चरात ५ ते ६ घमेली शेणखत, २ ते ३ किलो निंबोळी पेंड, ४०० ग्रॅम नत्र, २०० ग्रॅम स्फुरद व ४०० ग्रॅम पालाश प्रत्येक झाडास द्यावे. खते देऊन झाल्यावर चर बुजवून खते झाकून घ्यावीत. तसेच पाणी खोडाला लागू नये म्हणून पाणी बांगडी पध्दतीने डबक आळे तयार करून त्यातून द्यावे. फळधारणेनंतर १५ ते २० दिवसांत १० पी.पी.एम, एन.ए.ए. + १ टक्का युरीया हयांचा फवारा द्यावा. त्यामुळे फळगळ कमी होईल.

आंबा –

१) कलम करताना बांधलेली प्लॅस्टीकची पट्टी तोडावी.

२) कलमाच्या खोडावरील जोडाखालील फूट काढावी.

३) पावसाळा संपल्यानंतर येणा-या कोवळ्या फुटीवर तुडतुडे मोठ्या प्रमाणात येतात, त्यावेळी संपुर्ण झाडावर ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवड्यात १० लिटर पाण्यात २५ टक्के सायपरमेथ्रीन – ३ मि.ली., अथवा २० टक्के फेनव्हेलरेट ५ मि.ली. किंवा २.८ टक्के डेकॅमेथ्रीन ९ मि.ली. फवारावे.

४) किटकनाशकाची दुसरी फवारणी काडीचे डोळे फुटताच खोडावर, फांद्यावर व शेंड्यावर करावी. १० लिटर पाण्यात ३५ ट्क्के एन्डोसल्फान १५ मि.ली. किंवा ५० ट्कके कार्बारील २० ग्रॅम या प्रमाणात वापरावे. जर फवारणी मोहोर फुटताच केली तर त्यामध्ये पाण्यात

मिसळणारे गंधक २० ग्रॅम अथवा १० ग्रॅम कार्बेन्डॅझिम किंवा ट्रायडिमेफॉन मिसळावे. यामुळे भुरी रोगाचे नियंत्रण होईल.

डाळिंब –

१) नवीन लागवड केलेल्या झाडांना काठीचा आधार द्यावा.

२) डाळिंबावरील रोग व किडीचा बंदोबस्त करावा. फळ पोखरणा-या आळीच्या नियंत्रणासाठी ५० टक्के कार्बारील १००० ग्रॅम ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. फळावरील ठिपके रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बेन्डेझिम ५०० ग्रॅम किंवा बोनलेट ५०० ग्रॅम अथवा मॅन्कोझेब १२५० ग्रॅम ५०० लिटर पाण्यात मिसळून दर १० – १५ दिवसांच्या अंतराने फवारावे.

फुलझाडे –

१) शेवंती – पानावरील करपा रोग नियंत्रणासाठी क्लोरोथॅलोनिल ०.२ ट्क्के या बुरशीनाशकाची फवारणी करावी.

२) गुलाब – उघड्यावरील गुलाबाची छाटणी करावी त्याचप्रमाणे छाटलेल्या भागावर १० टक्के बोर्डोपेस्ट लावावी.

३) ग्लॅडीओलस – लागवडीपूर्वी कंद व मर रोग नियंत्रणासाठी कॅप्टन ०.३ टक्के या बुरशीनाशकाच्या द्रावणामध्ये १५ मिनीटे बुडवून नंतर ४५ X १५ सें.मी. अंतरावर सरी पध्दतीने लागवड करावी. सुरूवातीस हेक्टरी ५० ते ६० टन शेणखत घालावे व लागवडीच्या वेळेस ७५ किलो नत्र, २०० किलो स्फुरद व २०० किलो पालाश याप्रमाणे खतांची मात्रा द्यावी.

४) हंगामी फुलझाडांची स्टॅटीस, अॅस्टर, झेंडू, फॅलाक्स, कॅलेंडुला इ. लागवड करावी.

५) फुलझाडे लावताना मुळावर, कंदावर अॅझोटोबॅक्टर जीवाणूच्या ४ पाकीटे प्रती १० लिटर पाण्यातील द्रावणात बूडवून लागवड करावी.

**कृषि विज्ञान केंद्र**
**बारामती**

**Field operations to be carried out in the month of October (Pune District)**

Sugarcane-
1) Provide the adsali sugarcane with 160 kg / ha. nitrogen as a second dose (350 kg urea/ ha) at 6-8 weeks after planting.
2) Provide the sugarcane crop with irrigations as per the need of the crop.
3) As per the recommendations complete the preparatory tillage operations and keep field ready for plantation of preseasonal Sugarcane.
4) To plant the preseasonal sugarcane be ready with good quality seedsets from nursery, fertilizers etc. select a variety which is recommended for cultivation. (CO-94012, CO-740, CO-7219, CO-86032, CO-8014, COM-88121)
5) Use drip irrigation system for sugarcane plantation.
6) Complete the planting of preseasonal sugarcane between the 15th October to 15th November.
7) Decide the sugarcane field by considering the availability of water.
8) To achieve water saving make use of mulches. Likewise adopt 'one leaving another furrow irrigation' method of irrigation.
9) Complete the planting by using two eye buded seed sets. Keep 12-15 cm distance between two sets.
10) In heavy soil seed sets of 25000 would be sufficient to plant in one hectare area. In medium to loose soil sets of 30,000 would be sufficient to plant in one ha.In single budded system keep distance of 30 cm between two sets. Sets of 33,500 are sufficient to plant in one hectare area.
11) In medium type of soil carry out planting by wet method of planting. In heavy, saline and salty soil, carry out planting by dry method of planting. Care to taken that the buds should be align at sides.
12) For preseasonal sugarcane apply 34 kg of nitrogen, 85 kg of phosphorus and 85 kg potash per hectare.
13)To control the sugarcane wooly aphids carry out spraying of endosulphan 500ml + metasystox 1000 ml + 500ml sticker mixed in 500 liters of water. Fifteen days after this spray release 2500 crysoperla or conobathra larvae on sugarcane crop for one hectare area.

Wheat-
1) Choose heavy and deep but well drained soils for cultivation of wheat crop.
2) It is essential to provide ample amount of organic manures in

medium and loose soils.
3) Rainfed wheat should be grown in the heavy soils which retains moisture for longer period.
4) Rainfed wheat should be sown in the second fortnight of October. Irrigated wheat should be sown in the first fortnight of November. To achieve this complete the preparatory tillage operations and keep your field ready for sowing.
5) Keep spacing of 22.5 to 23 between two rows and place the seed not more than 5-6 cm deep.
6) Do not sow the crop vertically and horizontally. Carry out single row sowing to facilitate intercultivation.At the most use double bowl seed drill for sowing which helps to sow the seed as well as fertilizer.
7) Use flat bed method for planting and prepare sara of 2.5 to 3 metre breadth and open out channels in horizontal direction.
8) To get the good yield of wheat a plant population of 20-22 lakhs should be maintained. To achieve this use 125-150 kg of seed while sowing in the month of November.
9) Under late sown conditions use 125-150 kg of seed and carry out sowing by maintaining 18 cm distance in rows.
10) For rainfed use 75-100 kg of seed and maintain spacing of 22.5 cm in rows.
11) Improved varieties-
Rainfed-
A) Bansi N – 59,
B) Sarbati- N- 8223, N-5749 and NI-5449, NIAW-15( Panchwati)
Irrigated-
Timely Sown conditions- HD-2189, HD-2278, HD-2380, DWR-162, MACS-2496, MACS-2846, NIAW-301( Trymbak), NIDW-295 ( Godawari)
Late sown conditions-HD-2501, HI-277 and NIAW-34
12) Fertilizers-
A) Mix 25-30 bullockcart load Farm yard manure for one hectare area at the time of harrowing.
B) For irrigated wheat under timely sown conditions provide the dose of 120 kg N, 60 kg P and 40 kg K per ha. Half of the nitrogen and total P and K should be applied at the time of sowing. Remaining half quantity of N should be given at three weeks after sowing.
c) Under late sown conditions provide the crop with 80 kg p and 40 kg K should be provided in two doses as mentioned above.
D) For rainfed wheat provide the crop with 40 kg N, 20 kg P and 20 kg K per hectare.
E) Treat the seeds with azotobacter and Phosphate solubilizing bacteria @ 250 kg for 10 kg of seed.

Jowar-
1) To sow the rabi jowar select improved and recommended varieties. Use varieties like selection-3 for loose soil, SPV-86, swati, CSH-13, Phule Yashoda, Maldandi 35-1, Mauli for medium to heavy soils.
2) Complete the sowing by the 15th of October.
3) Use the seed @ 10 kg for one hectare and treat the seed with 300 mesh sulphur @ 4 kg per kg of seed. Then treat the seed with azotobacter 250 gm per 10 kg of seed.
4) Maintain the spacing of 45 x 15cm for sowing.
5) For irrigated crop in heavy soils apply 100 kg of N, 50 kg of P and 50 kg of K for one hectare area.Out of that 50 kg N, 50 kg P and 50 kg K should be given at the time of sowing and remaining 50 kg N should be provided at 25-30 days after sowing. In medium soil 80:40:40 per ha. dose and in loose soil 50:25:0 per ha.dose should be provided in two splits as mentioned above.
6) For dryland crop 25-30 kg of nitrogen should be applied at the time of sowing with the help of double bowled seed drill.
7) If the incidence of stem borer, shoot fly, aphids, jassids seems on the crop then take a spray of endosulphan 35% 14ml or dimethoate 30% 10ml mixed in 10 liters of water. Remove and burn out the pest affected plant parts. To control the stem borer and shoot fly in biological way use two trichocards per acre.
8) To control the army worms dust the powder of methyl parathion 2% @ 20 kg per hectare.

Groundnut-
1) Keep your crop weed free.
2) Provide protective irrigations if water scarcity seems.
3) To control the Tikka and rust disease carry out 3-4 sprayings of 0.05% carbendezim or 0.2% mancozeb with a gap of 20 days at 30 days after sowing.
4) To control the pests like leaf eating caterpillar, hairy caterpillar, pod borer spray the crop with 36% monocrotophos @ 14ml or 20EC cypermethrin @ 4 ml mixed in 10 liters of water or dust 1.5% quinolphos powder or 5% malathion or 4% foselon @ 20 kg per hectare or spray 5% neem seed extract.

Gram-
1) Choose medium to heavy and well drained soil.
2) Rainfed gram should be sown in the first week of October.Irrigated gram should be sown in between 20 October to 10 November.This helps to get congenial environment to the crop and eventually the good yields. Carry out sowing on Wapasa condition.
3) Seeds- Quantity of seeds to be used for sowing will vary according

to the variety used. For Vikas and Phule G-12 use 70 kg seed per ha., for viswas and vijay 85 kg and for vishal and virat use 100kg of seed.
4) Seed treatment- Use certified or recognized seeds for sowing. If the seeds have not been treated with any fungicide then treat the seeds with 1-1.5 gm bavistin or 2-2.5 gm thirum or captan. Seeds should be soaked in jaggery water and then sow by drying them in shade.
5) Sowing should be done in spacing 30 x 10 cm and plant population of 3,33,333 should be maintained.
6) Fertilizers-
Rainfed Gram- Fertilizer should be drilled before sowing @ 12.5 kg of N and 25 kg of P (28 kg urea and 156 kg of super phosphate). To achieve this sowing should be done with double bowled seed drill.
Irrigated Gram- Fertilizer should be drilled before sowing @ 25 kg N and 50 kg P ( 56kg urea and 312 kg super phosphate). To achieve this sowing should be done with double bowled seed drill.
7) Irrigation management- Generally gram needs 12cm of water. Sow the crop in wapasa conditions. Considering the soil water level first irrigation should be provided at 30-35 days after sowing and second at 60-65 days after sowing. Every time provide water in correct proportion.
8) Intercultivation- Carryout hoeing and one weeding at 21 days after sowing. If needs carryout second weeding at flowering stage of crop. To bring down the expenditure on weeding spray weedicide fluchloralin or pendimethalin @ 1.5 liter per ha.mixed in 500 liter of water before sowing and then carry out harrowing to mix the weedicide in the soil.

Safflower-
1) Use improved varieties for sowing. Bhima becomes ready in 130 to 135 days and yields 14-16 quintal per hectare. Select varieties like Bhima or JLSF-414 for sowing.
2) Use 10-12 kg seed for one hectare area.
3) Treat the seeds with bavistin @ 2 gm per kg of seed and then with azotobacter @ 250 gm per 10kg of seed.
4) Take sole crop of safflower.
5) Give protective irrigations to the crop.
6) In dryland area sowing should be carried out in second week of September and in other areas it should be completed from second week of September to first week of October. Under late sown conditions sowing should be completed by the 10th of October.
7) Sowing should be done with 45cm seed drill. Care is to be taken that Seeds should be placed 5-6cm deep in the soil.
8) Mix 5 to 10 tonns of farm yard manure in the soil at the time of harrowing. Maintain 1lakh plants in one hectare area.
Kharif crops-

French bean, soybean, coriander, pea etc crops should be harvesting at right time considering their maturity. Produce should be stored only after sundrying.

Red gram-
To control the pests like aphids, jassids,thrips,pod borers spray the crop with endosulphan 35% 20 ml or quinolphos 15ml mixed in 10 liters of water. Use pheromone traps. To control pod borer use BT or HNPV.If the spraying is not possible dust the crop with carbaryl 10% powder or quinolphos 1.5% powder or methyl parathion 2% powder @ 20 kg per hectare.

Vegetables :-
Onion
a) Do transplanting of rabi onion in flat bed at spacing of 12.5 X 7.5 cm. Before transplanting apply 50 kg N, 50 kg P and 50 kg K / ha.
b)Irrigate the field, 24 hours before uprooting of seedlings and select only medium sized seedlings for transplanting (0.5 cm in diameter)
c)Trim out 1/3 portion of seedling from top and dip the tops in mixture of monocrotophos 12.5 ml and Dithane M-45 25gm. In 10 lit of water and dip the roots in 1 % urea solution and there after in azotobacter solution (4 packet of azotobactor in 10 lit. water)
d)Use Agrifound light red, N-2-4-1, Pusa Red, Arka Niketan etc. varieties of rabi Onion. For export in Europion countries Phule Suvarna and for processing Agrifound white-1, Phule safed and N-275-9-1, these are the best varieties.
e) Prepare the field after 25 oct. for seed production of onion. Plant the cut onion bulbs at 60 X 15cm in flat bed or 45 X 30 cm on ridges and furrows. Dip the bulbs in carbendazym solution (1g in 1 lit. water) before planting. Keep 1 to 5km isolation distance between two seed production plots.
f)Dry the stored kharif bulbs for 10-15 days and select only good bulbs for planting to produce seeds.
g)Check the kharif onion in field for neck-fall, if there is no sufficient neck-fall then roll empty drum on it, to obtain artificial neck-fall then after drying of leaf tops, harvest the crop.
h)Apply second dose of 50 kg N to rabi onion if one month is completed after transplanting.
i)If there is inadequacy of irrigation of possibility of inadequacy in summer months then select onion as cash crop instead of sugarcane.
j)Weed management – use Basaline preemergance herbicide ( 1 to 1.5 lit. in 500 lit. water) for 1 hactor or Gol post emergence herbicide (100-200 ml in 500 lit water) after 25 days for 1 ha. Area.

2) Garlic –
a) planting of garlic should in done at spacing 10 X 7.5 cm and 3 cm. deep in flat beds in second or third week of Oct.
b) use shweta, Godawari, Jamnagar etc. varieties of garlic. Apply 50 kg N, 50kg P and 50 kg K before planting at the time of field preparation 25 tonns F.Y.M. should be incorporated in soil.
c) Dip the garlic cloves in 20 P.P.M (20mg / lit. water) solution of IBA for an hour.
3) Tomato :-
a) Use dhanashri, bhagyashri and Rajashri varieties of tomato and sow the seeds on raised bed to prepare seedlings for rabi cultivation. Treat the seed with thyrum before sowing.

4) Cabbage and cauliflower :-
a) Dip the seeds in hot water (50 degree Celcius) for half an hour and there after in streptocycline 100 ppm (100mg / lit water) for two hours. After dipping dry the seed in shade sow on raised beds in lines.
b) select pride of India, Early drum head or golden acre etc varieties for cabbage and snow-ball-16, Pusa synthetic, Dania, Pusa Deepali, Pusa Snow-ball-1 etc. Varieties for Cauliflower.

5) Potato :-
a) Planting of potato should be done at spacing of 45 X 30cm in sara or 60cm X 15cm in furrows prepared by wooden plough.
b) use varieties like kufri Sinduri, Kufri Lavkar, Kufri Chandramukhi, or Kufri Jyoti.
C) Cut the tubes in such a way that 2-3 buds remain on each piece.
d) before planting wash the pieces with 3g. thyrum / lit. of chlorinated water.
e) clean the cutting devices with 0.3 % blitox solution (3 g. blitox in 1 lit. water) before use.
f) Apply 40-50 cart loads of FYM + 100 kg N + 60 kg P + 120 kg K / ha. Before planting.

6) Leafy vegetables :-
a) choose leafy vegetables like palak, Methi, Coriander, Chakwat, Amaranthus, Shepu, Letuce etc. for sowing or planting in this month.

Fruit crops :-
1) Fig :-
a) Prepare basin properly around each tree in the orchard and apply 400 g. N/plant one month after fruit seetings.
b) In newly planted orchard loose the soil in each basin by weeding hook and mulch it with dried grass.

C) spray the crop with chlorothalonyl (1000 g. in 500 lit. water) at an interval of 15 days for control of rust disease.

2) Grapes :-
a) Prun out all side shoots or which ½ or more part is immature, keeping only one bud on each shoot.
b) manage the weed problem properly in the orchard.
c) If green manure is taken, burrow it in soil.
d) check the orchard properly for disease and pests and spray accordingly.
e) To obtain leaf fall before pruning, use 3-4 % Thiouria solution for varieties like Thomson seedless Tas-E-Ganesh, sonaka etc. and Ethrel 1000 ppm for coloured varieties e.g. kismis chorny, flem seedless etc.
F) Apply 10 tonns of FYM / acre, a week before pruning also apply 10 kg ferrous sulphate + 10 kg zink sulphate + 20 kg magmesium sulphate before pruning, according to soil testing report. The recommended dose for grape is 900kg N, 500kg P and 700 kg K out of which apply 250 kg N before pruning and 135 kg N, 15 days after pruning. In addition to these 250-400 kg Biophos (Vermicompost) + 500 – 750 kg phosphate solubilizing bacteria (biofertilizer) should be applied.
g) pruning should be done at mid of the month i.e. 15 oct.
h) While pruning, check the occurance of small bunches on vine. And according cut the branches after 7th, 8th or 9th bud. Remove all leaves manually if remained after pruning.
i) If subcane is used for planting, prun the sub cane at 1st or 2nd bud.
j) Prunning should be done at Wapsa condition. One the same day of pruning carryout spray of cynamide (kidor, Dorbank, Dormax) 20-40 ml / lit. water. Remove loose bark on stems and apply bordo paste on them. Protect the crop from udadya beetle.
k) Do the interculturing operations for weed control after pruning.
l) Collect all diseased plant parts, twings and leaves and destroy it.
m) loose the soil to break hard crust and give a slight irrigation.

3) Ber :-
a) To control fruit borers spray 50 % carbaryl 40 g. or 20 % fenvelrate 5ml or 25 EC Quinolphos 20ml in 10 lits of water. If incidence of powdery mildew is seen mix Danocamp 10 ml or Trydemorph 10 ml in above solution and spray 2-3 times at an interval of 6-10 days.

4) Guava :-
a) keep harvesting the mrig bahar fruits.
b) clean those orchards in which harvesting is over and train the trees properly.

c) Fruit fly is very serious pest of Guava to control it spray with 25% cypermethrine 4ml in 10 lits of water.
d) To protect the crop from fruit rot and guava canker apply 3-4 sprays of propicnazole (0.01%) or Carbendazim 500g. and mancozeb 1000 g. in 500 lit. water / ha. At an interval of 15 days.

5) Kagzi lime :-
a) In the areas of low rainfall and light soils it is better to follow Hasta bahar. Hasta bahar fruits becomes ready for market in summer months e.g. march-april. To obtain more fruit set application of 1000 ppm cycocil in Aug-Sept. gives good result after that 10 ppm 2-4-5-T should be applied in 1st week of Oct. Before fruit set spray with 1ml ethrel in 1 lit. water to obtain leaf fall. Loose the soil properly by interculturing. Cut out the dried and diseased branches from the trees and apply bordo paste on cuts as well as on stems of trees. Dug the trench under spread of each tree and apply 5-6 baskets of FYM, 2-3 kg neem cake, 400 g. N, 200 g. p. and 400 g. K / tree. Basin should be prepared in such away that water may not touch to the stem of trees. Spray the crop with 10 ppm NAA + 1 % Urea 15-20 days after fruit set.

5) Mango :-
a) Remove the plastic strip tied. White grafting the seedling.
b) Remove the growth on root stock.
c) The tender shoots are mostly affected by jassids after rainy season to control them spray the trees with 25% Cypermethrine – 3ml / 10 lit water or 20 % Fenvelrate -5ml or 2.8 % Decamethrine 9ml in 10 lit of water.
d) follow the second spray of insecticide immediately after dud sprouts with 35 % Endosulphan 15ml or 50 % Carbaryl 20 g. in 10 lit. water If spraying is followed after flowering mix 20 g. of wetable sulphur or 10 g. Carbendazim in above solution, it help to control powdery mildew.

6) Pomegranate –
a) Provide support to the trees in newly planted orchards.
b) Protect the crop from diseases and pests.
c) To control fruit fly spray 50 % carbaryl 1000 g. in 500 lit. water. For fruit spot disease spray with carbendazim 500 g. or Benlet 500 g. or Mancozeb 1250 g. in 500 lit of water at an interval of 10-15 days.
Flowers :-
1)Crysanthemum :-
a)To control leaf blight spray the crop with 2% chlorothalonyl fungicide.

2) Rose :-
a) Rose crop cultivated in fields should be pruned out Apply 10 % bordo paste on all cuts.

3)Gladiolus :-
a)Dip the corms in 0.3 % captain solution to prevent damping off disease and then plant the corms at 45X15 cm spacing in ridges and furrows. Apply 50-60 tonns of FYM + 75 kg N + 200 kg P + 200 kg K at the time of planting.

4)Go for cultivation of seasonal flower like statis. Aster, Merigold, Falax, Calandulla etc.
5)At the time of planting of plants treat them with Azotobacter solution (4 packets in 10 lit. of water)

**Krishi Vigyan Kendra,**
**Baramati,**
**Dist: Pune.**